ISSN 2230-7850 Impact Factor : 3.1560 (UIF) Volume - 5 | Issue - 11 | Dec - 2015

Indian Streams Research Journal

# कविता संकल्पना व स्वरूप

पद्माकर तामगाडगे
मराठी विभागप्रमुख, सिद्धार्थ कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मुंबई.

## 1.प्रस्तावना

जगभरात अत्यंत रसिकप्रिय असणारा साहित्य प्रकार म्हणजे 'कविता' होय. भारतीय साहित्यातही कविता हा साहित्य प्रकार प्राचीन काळापासून ज्ञात आहे. बुद्धांच्या निर्वाणानंतर त्यांच्या प्रवचनातून मिळालेले ज्ञान 'उदान' म्हणून अनुयायांनी संकलित केले. पाली भाषेतून लिहिल्या गेलेल्या या गाथा सुद्धा काव्यच आहेत. अशा या प्राचीनत्व असणाऱ्या साहित्य प्रकारची उत्तरोत्तर सैद्धांतिक मांडणी होत गेली. त्या प्रकाराला लोकप्रियतेबरोबरच शास्त्रोक्त आकार येऊ लागला व काव्याचे विविध प्रयोग होऊ लागले आणि अनेक प्रकार विकसित झालेत. मराठी साहित्यात काव्याचा प्रारंभ मुकुंदराज यांच्या 'विवेकसिंधू'पासून गणल्या जातो ज्ञानेश्वर, महादंबा, नामदेव, एकनाथ, तुकाराम, चोखामेळा, इ. संतांनी आपल्या काव्यातून जनप्रबोधन घडवून आणले. कवितेची शक्ती एखाद्या शस्त्राहूनही अधिक असू शकते हे वारंवार अनेकांनी सूचित केले. तसे अनेकदा प्रत्यक्ष परिणामही आपण पाहत आलो आहोत. 'my poem ; my weapon' ही भूमिका संतांपासून आधुनिक कालखंडापर्यंत अधिकच पक्की होत गेलेली आहे. संत तुकाराम आपल्या काव्याच्या क्षमते बद्दल म्हणतात "आम्हा घरी धन, शब्दांचीच रत्ने ; शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू | शब्दची आमुच्या जीवाचे जीवन; शब्दे वाटू धन जनलोका ||" तसेच अर्वाचीन मराठी कवितेचे जनक केशवसुत या संदर्भात म्हणतात "काव्य पंक्तीची तरफ आमुच्या करी विधीने दिली असे ; टेकुनी ती जनता शीर्षावरी | जग उलथूनिया देऊ कसे ||"



ही प्रचंड आश्वासकता त्यांच्या काव्यामध्ये पाहायला व अनुभवायला मिळते.

ललित साहित्याचे साधारणता नाटक, कथा, कादंबरी, चरित्र-स्वकथन, प्रवासवर्णन, वैचारिक निबंध, रिपोर्ताज अशा या साहित्याच्या विविध प्रकारापैकी कविता हा एक साहित्य प्रकार होय. तो समजून घेण्यासाठी कविता म्हणजे काय? व्याख्या, स्वरूप, कवितेच्या सैद्धांतिक घटकांची तपशीलवार माहिती आणि कवितेचे प्रकार समजून घेणे अगत्याचे आहे.

कोणत्याही साहित्याप्रकारांची व्याख्या ही परिपूर्ण असेलच असे सांगता येत नाही अनेकदा अव्याप्ती आणि अतिव्याप्तीची सदोषता असू शकते. भारतीय मीमांसकांनी केलेल्या 'काव्य' या संकल्पनेच्या परिभाषा ह्या एकंदर साहित्याला समोर ठेऊन केलेल्या असल्या तरी नाटक हा साहित्यप्रकार त्यांच्या अग्रभागी असल्याचे दिसते. नंतरच्या चर्चकांनी काव्य ही संकल्पना विस्तृतपणे चर्चिली गेलेली दिसते त्याचे विविध पैलू त्यांनी निदर्शनास आणून दिलेत.

**व्याख्या :**

**काव्यविषयक प्राचीन व्याख्या :**

१. || बन्धे व्यवस्थितौ काव्यं तद्विदाल्हादकारिणि | शब्दार्थो सहितौ वक्रकविव्यापारशालिणि“”
सहृदय रसिकांना आल्हाददायक अशा कवीच्या विदग्ध अथवा वाक्रोतीपूर्ण पदबंधामध्ये योजिलेले शब्दार्थ )
(.म्हणजे काव्य -कुंतक

२. ":सौंदर्यम् अलंकार | काव्यम् ग्राह्यम् अलंकारात्“
– (.सौंदर्य हाच अलंकार होय ; काव्य अलंकारान्मुलेच ग्राह्य होते)वामन

३. || शब्दार्थौ सहितौ काव्यम्“”
(.शब्द आणि अर्थ यांचे साहितात्त्व म्हणजे काव्य) भामह-

४. || ननु शब्दार्थौ काव्यम्“”
(.खरोखर शब्द आणि अर्थ म्हणजेच काव्य) रुद्रट-

५. शरीरं“तावदिष्टार्थव्यवच्छिन्ना पदावली ||”
(इष्ट अर्थाने युक्त असलेली पदावली म्हणजे काव्याशरीर) दण्डी-

६. रीति|| आत्मा काव्यास्य :”
(.रिती म्हणजे विशिष्ट गुणांनी युक्त अशी पदावली हाच काव्याचा आत्मा होय) वामन -

७. तत् अदोषौ शब्दार्थौ सगुणौ अनलंकृती पुनः क्वापि ||”
द)ोषरहित (.क्वचित स्फुट अलंकार्रहित शब्दार्थ म्हणजे काव्य ,गुणयुक्त , मम्मट -

८. || काव्यम् :शब्द :रमणीयार्थप्रतिपादक“”
(.रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारे शब्द म्हणजे काव्य होय) जगन्नाथ -

९. ध्वनी हाच काव्याचा आत्मा होय . आनंदवर्धन -

१०. || वाक्यं रसात्मकं काव्यम्“”
(.रसात्मक वाक्य म्हणजे काव्य होय) विश्वनाथ -

११. || शब्दार्थौ सहितौ काव्यम्“”
(.शब्दार्थांचा यथोचित सहभाव म्हणजे काव्य) राजशेखर -

१२. || काव्यं : शब्द : रमणीयार्थप्रतिपादक“”
(.रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारा शब्द म्हणजे काव्य होय) - जगन्नाथ

१३. निर्दोषं गुणवत्“काव्यं अलंकारै|| कुर्वन् कीर्ति प्रीति च विन्दति :रसान्वितम् कवि | अलंकृतम् :”
भोज - (.गुण आणि निर्दोषता या चार काव्यलक्षणाने युक्त असणारे ते काव्य ,अलंकार ,रस)

**काव्यविषयक पाश्चात्य व्याख्या :**

१. “the language of the imagination and the passions.” काव्य) ही कल्पना आणि भावना यांची भाषा होय (. हजलिट् -

२. T“he best words in best order.” (.उत्तम क्रमात विणलेले उत्तम शब्द म्हणजे काव्य होय) - कोलरीज

३. “The art of producing pleasure by the just expression of imaginative thought and feeling in metrical language.” छंदोबद्ध भाषेत कल्पनारम्य विचार आणि भावना अभिव्यक्तीने )
(.आनंद उत्पन्न करणारी कला म्हणजे काव्य होय कोर्टहॉप -

४. “the rhythmic creation of beauty.” (सौंदर्याची लयबद्ध निर्मिती म्हणजे काव्य (. एडगर - ॲलन पो
५. “The most delightful and perfect form of utterance that human words can reach.” ( मानवी शब्दांच्या झेपेची अत्युच्च शक्यता दाखविणारे अतिशय रमणीय आणि परिपूर्ण असे उच्चारीत रूप म्हणजे काव्य होय(. - अर्नाल्ड
६. “The spontaneous overflow of powerful feelings.” उत्कट भावनांचा उत्स्फूर्त आविष्कार म्हणजे ) काव्य होय (. वर्डस्वर्थ -
७. “It is not with ideas that one makes sonnets, but with words.” (कवी सुनीतरचतो तो (काव्य) (.तर शब्दांच्या जोरावरच , केवळ कल्पनेच्या जोरावर नव्हे मेलार्म -

### काव्यविषयक आधुनिक व्याख्या :

१. .अर्थ आणि ध्वनी ,नाद .काव्याचे घटकावयव तीन दिसतात“नुसती शब्दरचना म्हणजे काव्य नव्हेती . त्या बह्यार्थाच्या ,बह्यार्थ सुंदर पाहिजे,शब्द यथोचित पाहिजेत .अर्थवती व ध्वनिवती पाहिजे ,नादावती .अंतरंगी असणारा अर्थ जो रसिकाने आपल्या रसिकतेनेच काढावा लागतो तो अर्थही फार सुंदर पाहिजे” - हआपटे .ना .
२. हृदय संवेद्य अ“र्थ आणि रसाळ तालबद्ध समर्पक शब्दयोजना पाहिजे.हि दोन्ही जेथे आहेत ते काव्य .” पटवर्धन .ब .वा -
३. या साऱ्या कलांचे .नर्तन इत्यादी कलांबरोबर साधर्म्य आहे ,चित्र ,काव्य ही एक कला आहे तिचे शिल्प“ .अस्तित्व ह्यातील सौंदर्य दर्शनावर अवलंबून आहे” – रा जोग .श्री .
४. प्रतिमांची सेंद्रिय रचना म्हणजे कविता होय.” - सुधीर रसाळ
५. ,छंद ;नाद आणि अर्थ असलेल्या शब्दांची साम्मूल्यातेच्या तत्त्वानुसार केलेली मांडणी असलेल्या ओळींची“ प्रती ,प्रतिमा ,अलंकार ;तालांत बांधलेली-मुक्तशैली यांतील लय-मात्रावृत्त अथवा मुक्तछंद ,अक्षरगणवृत्तक , वाच्यार्थातून स्पंदित होणारा व्यंग्यार्थ असलेली ;आदिबंध यांच्या उपयोजनाने अर्थसंपृक्त असलेली ,मिथक .म्हणजे कविता ,रचना”[१] ,विजय प्रकाशन ,एक साहित्यप्रकार: कविता) वसंत आबाजी डहाके - (५५.पृ ,२०१३ .सेप्टे .आ.प्र ,नागपूर
६. कविता ही सुघटीत भाषिक कृती असते आ“णि भाषा ही शब्दांमधील अर्थांच्या संबंधांची संरचना असते . कारण ती तपशिलाची मर्मे किंवा समग्रतेचे निष्कर्षच .कवितेतील शब्दांना पराकोटीची जिवंतता प्राप्त होते .कवितेतील शब्दांच्या वाट्याला इतर साहित्याप्रकारांमधील शब्दांपेक्षा फार निराळी भूमिका येते .मांडते विश्वविराटाची मर्मे कवितेला शक्य तेवढ्या कमी शब्दांमधून मांडायची असतात.” [२] - डॉ यशवंत मनोहर . (२०१४ मे ११-१० ,नागपूर ,बीजभाषण ,आंबेडकरी काव्यसंगीती)

कवितेच्या प्राचीन अभ्यासकांनी मांडलेल्या काव्य परीभाषेपासून आजच्या कालखंडात बदलत गेलेली कवितेची एकंदर वाटचालच वरील व्याख्यांमधून दिसून येते.

### काव्य आणि कविता :

काव्य आणि कविता यात एक अस्पष्टसा फरक आहे. कविता हा एक स्वतंत्र साहित्य प्रकार असला तरी काव्य इतरही साहित्य प्रकारांमधून येताच असतो. साहित्याला जिवंतपणा आणण्यासाठी कथात्मक साहित्यातही काव्य आढळते. डॉ. यशवंत मनोहर या संदर्भात म्हणतात, “काव्य हा गुणांचा समुच्चय आहे. उत्कटता, प्रत्ययकारकता, नादगुण, ऐंद्रिय संवेदनांच्या पलीकडचे भावमय अर्थ, प्रतीमायुक्तता, अमूर्त भाव-संवेदनांचे समूर्तीकरण अशा गुणांमुळे भाषेत काव्यमयता निर्माण होते. ही काव्यमयता नाटकातही असू शकते. कादंबरीतही

असू शकते. कथेत आणि ललित निबंधातही असू शकते. अनेक साहित्यिकांच्या साहित्यात अशी काव्यमयता आपल्याला दिसते आणि ती आपल्याला मोहीतही करते. पण काही लेखकांच्या लेखनात या काव्यमयतेसोबत गद्यनिवेदनही येते आणि काव्यमयतेशी त्यांचा संबंध नसतो. पण कवितेत मात्र ही काव्यमयता सर्वत्र दाटूनच असावी लागते. इतर वांग्मयप्रकारांमध्ये काव्य येते पण त्याचे स्थान आणि स्वरूप वेगळं असते. पण कवितेतील संपूर्ण अवकाशच काव्यमयतेने गदगदून आलेला असतो."[३] (डॉ. यशवंत मनोहर, आंबेडकरी काव्यसंगीती, बीजभाषण, नागपूर, १०-११ मे २०१४, पृ. १०-११) याच संदर्भात वसंत आबाजी डहाके यांचे मत सुद्धा तेच सुचवतात, "कविता हा एक साहित्यप्रकार असला तरी त्यातही संरचनेनुसार अथवा आशयानुसार त्याचे काही प्रकारांत वर्गीकरण केले जाते. उदा. भावकाव्य(अथवा भावकविता), कथाकाव्य, खंडकाव्य, नाट्यकाव्य, गीत इत्यादी. काही काव्यप्रकार आशयात्मक तत्त्वांनी तर काही संरचनात्मक तत्त्वांनी सिद्ध होतात. आशयानुसार केलेल्या वर्गीकरणातही बह्यार्थनिरुपक, बाह्यार्थव्यंजक अथवा वस्तुनिष्ठ आणि स्वानुभूतीमूलक, स्वानुभूतिव्यंजक अथवा आत्मनिष्ठ असे उपप्रकार केले जातात. कथाकव्य, खंडकाव्य, नाट्यकाव्य हे वस्तुनिष्ठ काव्यप्रकार होत; तर भावकाव्य, गीत हे आत्मनिष्ठ काव्यप्रकार होत. काव्याच्या विविध प्रकारांचे स्वरूप पाहिल्यास अंतिमतः ते साहित्याच्या कथनात्मक, नाट्यात्मक व गीतात्मक या वर्गीकरणाशी निगडीत आहे, असे लक्षात येते."[४] (वसंत आबाजी डहाके, कविता :एक साहित्यप्रकार, विजय प्रकाशन, नागपूर, प्र.आ. सेप्टे. २०१३, पृ.५८) हे वर्गीकरण अभ्यासाच्या सोयीकरिता असले तरी कवी जाणीवपूर्वक तो प्रकार लिहितोच असे नाही. आपल्या आविष्काराचे स्वातंत्र्य त्याला असते आणि तो त्या प्रकारातून अभिव्यक्त होत असतो. कथनात्म साहित्यात काव्य येते ते त्याच्या व्यक्तिमत्वातील काव्यगुणांमुळेच. मात्र ती कविता होत नाही. तसेच कवितेतही कथनात्मकता असते म्हणूनच भाष्यकाव्य असे देखील कवितेचे वर्गीकरण केले जाते. प्राचीन अभ्यासकांनी काव्य म्हणजे ललित साहित्य याच अर्थाने ही संज्ञा वापरली मात्र कविता हा एक स्वतंत्र साहित्य प्रकार आहे.

### भावकविता आणि भावगीत :

माणसांच्या शारीरधर्मातच नादतत्त्व, लयतत्त्व अंतर्भूत असते. माणूस हा गाणारा प्राणी आहे असे सुसान लँगर म्हणतो. त्याने आदिगीताच्या उत्त्पत्तीची मांडणी केली आहे. सर्वात प्रथम गीत कसे जन्मले असेल याविषयी त्याने मानसशास्त्रीय दृष्टीने शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. मुळात साहित्य हे भावा शिवाय अभिव्याक्तच होत नाही. त्यामुळे कथा, कादंबरी, नाटक इत्यदी कथनात्म साहित्यातही भाव असतोच. त्यामुळे भावकविता किंवा भाव गीत असे न म्हणता त्यांना गीत काव्य म्हणावे असे एक मत समोर आले. प्राचीन काळापासून गीतांची परंपरा आपल्या मराठीत आहेच. लोकपरंपरेतून येणारे अनेक गीते आपल्याला दिसतात. ते गीतकाव्यच आहे. गंगाधर पाटील आपल्या 'गीतकाव्य संकल्पना परिवर्तने' या लेखात प्राचीन गीतात प्रमुख तीन परंपरा असल्याचे नोंदवतात. त्यात संतांनी जी अभंग या गीतकाव्याची परंपरा श्रेष्ठ स्थानी नेली व लोकाभिमुख केली ती आजही तेवढीच प्रभावी आहे. ओवी, अभंग, विराण्या, गौळणी, लावणी, लोकगीते, पद, आरती, भूपाळी, स्तोत्रे, पोवाडा इत्यादी गीतप्रकार समाजाच्या सर्वस्तरात लोकप्रिय होते. संतांनी रुजवलेल्या गेय काव्य प्रकारातून लोकप्रबोधन हा हेतू अग्रस्थानी होता. त्यातच भक्तीभाव व्यक्त करणारेही प्रकार कालसापेक्ष निर्माण झाले. ही दुसरी परंपरा होय. भजन-कीर्तनात संतांचे अभंग आरत्या, भूपाळ्या, स्तोत्रे यांची साधी अनलंकृत रचना, रागदारी संगीताश्रायी रचना नारदीय कीर्तनात पंत पंडितांची शब्द-स्वर यांच्या चमत्कृतींनी अलंकारीलेली गीतरचनाही होती. तिसरी परंपरा ही लोकपरंपरेतून आलेली लोकगीतांची होती.

आधुनिक कालखंडात पाश्चात्यांच्या साहित्यविश्वाचा परिचय झाला. त्यातच "लिरिक' ग्रीक कुळातील इंग्रजी काव्यप्रकार मराठीत परिचयाचा झाला. गंगाधर पाटील या संदर्भात संशोधन मांडतात की 'लिरिक' म्हणजे 'लायर' या वाद्याच्या साथीबरोबर गाण्यासाठी रचलेले गीत, अशी लिरिक काव्यप्रकाराविषयीची ग्रीक पंडितांची कल्पना.''[५] (समीक्षेची नवी रूपे , गंगाधर पाटील, मॅजेस्टिकप्रकाशन, मुंबई द्वि.आ. २००१, पृ. ४०) भावकविता आणि भावगीत यातील मुख्य फरक हा गेयतेचा आहे. संगीत आणि गीत यांची संमिश्रता घेऊन गाता येणारे ते भावगीत होय. अर्वाचीन कवितेचे अभ्यासक डॉ. अक्षयकुमार काळे या विषयी लिहितात, "आधुनिक मराठी काव्यात

त्याच्या अस्तित्वाला आकार येत असतानाच त्याला तंतुवाद्यांची साथ देणे शक्य असल्यामुळे त्याला 'वीणाकाव्य' असे नाव सुचविण्यात आले. या शिवाय 'लघूगीत', 'गीतक', 'लहरीकाव्य', तरंगकाव्य', 'मुक्तक', 'गीतिकाव्य', 'भावगीतिका', 'भावकाव्य', 'भावकविता' अशी अनेक नावे या प्रकाराकरिता सुचविण्यात आली. १९२० पर्यंत 'वीणाकाव्य' हा शब्द अधिक लोकप्रिय व रूढ असला तरी रविकिरणमंडळाच्या प्रयत्नाने 'भावगीत' हा शब्द अधिक लोकप्रिय व रूढ झाला. या शब्दांतून या काव्यप्रकारातील समानपणे असणारी भावप्रधानता व गानप्रधानता चांगल्या रीतीने सूचित झाली."[६]('अर्वाचीन मराठी काव्यदर्शन' डॉ. अक्षयकुमार काळे, पां. ना. बनहट्टी प्रकाशन नागपूर, १९९९, पृ. ७२३) आज 'भावगीत' हाच शब्द प्रचलित आहे. कवितेत गेयता असेलच असे सांगता येत नाही मात्र गीतात तो प्रमुख गुणधर्म मानला जातो. याविषयी रमेश तेंडुलकरांची भूमिका अशी होती की, "गीतगुण' हे कवितेच्या गीत या प्रकारचे महत्त्वाचे लक्षण आहे. कविता वेगळी, गीत वेगळे असेही म्हटले जाते. तेव्हा 'गीतकाव्य' हेही समर्पक असे नाव नाही. गेयता हे कवितेचे महत्वाचे लक्षण मानले जात नाही. 'गीत' हे एक संमिश्र कला म्हणून जन्माला आले, तर अन्य कशाचाही आश्रय न घेता, केवळ शब्दार्थातून आपले 'रूप' संघटीत करणे हे भावकवितेचे, गीताहून वेगळे लक्षण ठरेल."[७] गीतावर संगीताचे प्राबल्य अधिक असते म्हणूनच त्याच्या आशयाकडे फारसे लक्ष न देता त्याच्या श्रवणीयतेकडे व रसिकांच्या अभिरुचीकडे गीतकाव्याचा कल असतो. 'काव्य व संगीत मिळून बनलेले गीत ही एक संमिश्र कला आहे.

अलीकडील काळात नाट्य-चित्रपटसृष्टीला अधिक महत्त्व आल्यामुळे गीत काव्याला महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते सर्वसामान्य माणसांपर्यंत इंटरनेट, मोबाईल यांच्या माध्यमातून ते आणखीच सहज पोहचते. अशाच प्रक्रियेतून गीतकाव्य किंवा भावगीत हे सर्वप्रिय झाले आहेत. म्हणूनच भावगीत लिहिणाऱ्या व भावकाव्य लिहिणाऱ्या कवीला अनुक्रमे गीतकार आणि कवी असे वेगळेवेगळे ओळखले जातात. त्यातच सादरीकरणाच्या अंगाने लिहिणारे कवी हे मंचीय कवी म्हणून अलीकडेच उदयास आलेले दिसतात.

भावकविते विषयी वसंत आबाजी डहाके यांनी "गेयता आता भावकवितेचे लक्षण मानले जात नाही हे खरेच आहे; परंतु आधुनिक भावकवितेत शब्दांच्या अंतर्निहित ध्वनिसंगीताला विशेष महत्व दिले जाते. अंतर्मुखी दृष्टीकोन हे भावकवितेचे एक लक्षण सांगितले जाते भावकवीची दृष्टी सीमित, वैयक्तिक आणि आत्मनिष्ठ असते. सहजशुद्ध भाव, मुक्त कल्पना, तर्कवादापासून मुक्त विचार ही भावकवितेची लक्षणे सांगितली जातात. भावकवितेतून वैयक्तिक भावनेची अभिव्यक्ती केली जाते मात्र कवीचे ते 'आत्मकथन' नसते. भावकावितेत व्यक्त झालेले अनुभव कवीच्या साक्षात अनुभवाचे विषय असल्यामुळे एका 'मी'चे अनुभव म्हणून ते व्यक्त होतात. असे म.सु. पाटील यांनी म्हटले असून हा 'मी' कवितेच्या पूर्वी अस्तित्वात नव्हता. तो या कवितेच्या घडणीबरोबर घडत गेलेला, आकारात गेलेला आहे' कवितेतील 'मी' हा लौकिक जगातील कवी नसतो. कवितेतून कवीचे त्या त्या क्षणीचे अस्तित्वरूप व्यक्त होत असते."[८] असे नेमके विवेचन केले आहे. शिवाय भावकवितेचे काही गुणही ते निर्देशित करतात. "अंतर्निहित संगीतात्मकता आणि तीव्र स्वानुभूतिमुलकता हीच भावकवितेची मुख्य लक्षणे आहेत त्यामुळे भावकविता आकाराने लहान असते. भावमूलक एकात्मता आणि आकाराची लघुता या दोन गोष्टी परस्परसापेक्ष आहेत. भावकवितेत आरंभापासून अंतापर्यंत भावांची उत्कटता दिसून येते."[९] म्हणजेच भावकवितेत स्वानुभवाचे आविष्करण केलेले असते. लघुता हे लक्षण असते आणि भावनांची उत्कट प्रतीती आस्वादकांना शेवटपर्यंत येत राहते. त्यांना आपण भावकविता म्हणतो.

'भावगीत/गीतकाव्य' म्हणजे काय? या विषयी अशोक रानडे यांनी म्हंटले आहे की "गीतात सांगीतिक आविष्काराच्या शक्यता अधिक असतात आणि पर्यायाने स्वराविष्कार करण्यास योग्य अशी शब्दयोजना, तालाच्या वर्तुळात मोडतोड न करता बसेल अशी काव्यप्रवाहातील शब्दांची वाटणी आणि सांगीतिक रूप सिद्ध होऊ शकेल अशा तऱ्हेच्या विशिष्ट भावानासमुच्चयाचे अस्तित्त्व ह्या गोष्टी गीतात हमखास आढळतात." भावगीतात संगीताचे प्राबल्य झाल्यामुळे त्याच्या आशयाकडे फारसे समीक्षक व रसिक लक्ष देत नाही. मात्र ते सुमधुर असावे, श्रवणीय असावे, आल्हाद उत्त्पन्न करणारे असावे अशी अपेक्षा श्रोत्यांची असते त्यांना सामोरे ठेऊनच बहुदा गीत रचना केली जाते. त्यामुळे सहज सोप्या प्रतिमा-प्रतीकांचा वापरहोतो. त्यामुळे खूप क्लिष्ट रचना आढळत नाही. गेयता-नादमाधुर्यता हे गुण त्यात दिसून येते. डॉ. अक्षयकुमार काळे याविषयी लिहितात "गीतात व्यंगार्थप्रधान व्यामिश्र अर्थव्यूहाची अपेक्षा करणे योग्य ठरणार नाही एकूणच भावनेचा साधेपणा, खरेपणा आणि नैसर्गिक शैली ही गीताला

उपकारक ठरते. नादमधुर शब्दांच्या द्वारे श्रोत्यांना हवीहवीशी वाटणारी, नित्याच्या जीवनात खोलवर विचार न करता अनुभवास येणारी गाढ भावना गीतात आविष्कृत होते ही भावना ज्या विषयावर अधिष्ठित झालेली असते ते साधे, सोपे, स्थूल स्वरूपाचे असतात. गीतकाराचे काम हे की जो श्रोता त्याने गृहीत धरला आहे त्याला रीझवेल असे चिरपरिचित शब्द, प्रतिमा यांचा उपयोग करून ही भावना त्याने त्याच्यापर्यंत पोचविणे. रचनेची कुशलता अशा ठिकाणी अर्थातच अभिप्रेत आहे. फक्त त्यातील प्रयासशीलता दिसत कामा नये."[१०](अर्वाचीन मराठी काव्यदर्शन, डॉ. अक्षयकुमार काळे, पां ना. बनहट्टी प्रकाशन नागपूर, प्र.आ.१९९९, पृ. ७२७) वरील विवेचनावरून गंगाधर पाटील यांनी कॅथरिन यांची गीताची व्याख्या उधृत केली ती समर्पक आहे, "गायनानुकुल व लहानसा वृत्तबद्ध पद्यबंध" म्हणजे भावगीत होय. 'भावगीता'ची याहून सुटसुटीत व्याख्या कोणती असू शकेल?

भावगीत लिहिणाऱ्या कवींमध्ये ग.दि. माडगुळकर यांचे अग्रस्थान घेतले जात असले तरी आधुनिक कालखंडात लोकपरंपरेतून गीतरचनेचे बाळकडू घेऊन समाजातील लोकांचे रंजन करणारे व लोकजागृती करणारे लोकगीतकार महाराष्ट्रात होतेच. भीमराव कर्डक, वामनदादा कर्डक यांची भावकाव्य थेट काळजाला भिडणारी होती हेही नाकारता येत नाही. त्यांच्या गीतांमधून येणारी सहजसुलभ प्रतिमा, अप्रतिम नादमयता, भावनेची सहज व थेट भिडणारी आशयशैली, अचूक शब्दयोजना, नैसर्गिक आर्तता व आवाहन ही वैशिष्टये या गीतकारांना उपजतच लाभली होती. या गीत प्रकारांच्या उपप्रकारांविषयी मांडणी डॉ. अक्षयकुमार काळे करतात "अभिनय गीत, भक्तिगीत, संचलनगीत, क्रांतिगीत, समूहगीत, युद्धगीत, लोकगीत, श्रमगीत, ऋतूगीत, उत्सवगीत, गोपगीत, अंगाईगीत, कोळीगीत, स्त्रीगीत, द्वंद्वगीत, बडबडगीत इत्यादी."

एकंदरच भावकविता आणि भावगीतांमध्ये मूलतः भेद आहे हे वरील दोन्ही संकल्पनांवरून स्पष्ट होते. दोन्हीही काव्याचेच प्रकार असले तरी प्रवृत्तीभिन्नता ही दोन्ही काव्यप्रकारात ठळक रूपाने नोंदविता येते.

## कवितेची भाषा :

कोणत्याही साहित्याला 'भाषा' ही असतेच. भाषेच्या माध्यमातून साहित्यिक अभिव्यक्त होत असतो. कोणत्यातरी भाषेच्या माध्यमातून कवी आपल्या भावना शब्दरूप धारण करून अभिव्यक्त करीत असतो. कवितेला इतर साहित्यापेक्षा वेगळी भाषा असण्याचे कारण असे की कविता ही भाषिक नियमोलंघन करीत, भाषेची मोडतोड करून स्वच्छंदी रूप घेऊन आविष्कृत होत असते. कथनात्म साहित्य प्रकारापेक्षा कवितेची भाषा ही अधिक लयबद्ध, प्रतीक-प्रतिमांनीयुक्त, अलंकारप्रचुर असते. त्याचसोबत आपापल्या सामाजिक, वंशीय, कुलचिन्हांच्या भाषिक प्रतीमांसह मिथकांसह कविता भाषिकरीत्या वेगळेपण घेऊन सिद्ध होत असते. असे असले तरी कथनात्म साहित्यातही हे सगळे गुणधर्म थोडेबहुत असतातच मात्र त्यात व्यावहारिक जगाची भाषा सव्याकरण येते. आधुनिक काळात तर ही कवितेची भाषा अमुलाग्र बदलल्याचे चित्र दिसते. जागतिकीकरणाच्या कालखंडात ही भाषा आणखीच बदललेली दिसते. कवी हा सृजनशील असतो तो नेहमी आपल्या भावना शब्दबद्ध करीत असतांना कल्पनेच्या माध्यमातून प्रतिमा, प्रतीके, अलंकार, मिथक, आदिबंध यांच्या माध्यमातून भावना प्रकट करीत असतो. खरे तर भाषिक मोकळेपणा इतर साहित्य प्रकारांपेक्षा कवितेत अधिक असतो. प्राचीन कालखंडापासून काव्य या प्रकाराच्या चिंतनाचा ध्यास अनेकांनी घेतला आहे. भारतीय मीमांसकांनी या संदर्भात विस्तृत चर्चाही केलेल्या आहेत. काव्याची नेमकी अशी भाषा नसते. ती कवीच्या व्यक्तीसापेक्ष बदलणारी असते. कवितेतील भाषेला एक लय व नाद असावा लागतो. मात्र त्यातून उत्पन्न होणारा भावार्थ बाजूला सारून चालत नाही. काव्यार्थ असणे हेही तितकेच महत्वाचे मानले जाते. कवितेचे भाषिक वेगळेपण स्पष्ट करतांना वसंत पाटणकर भूमिका मांडतात. "लयबद्धतेबरोबरीनेच ही भाषा मोठ्या प्रमाणात यमके, अंतर्यमके, अनुप्रास, नादशब्द, रूपके, प्रतिमा, प्रतीके, मिथ्स, आदिबंध इत्यादी भाषिक विशेषांनी युक्त असते. या भाषेत अनेकदा शब्दांची, शब्दबंधाची, ओळींची पुनरावृत्तीही पहावयास मिळते. कवितेतील ओळी आणि काव्यखंड विशिष्ट ठिकाणी संपणे आणि विशिष्ट ठिकाणी सुरु होणे, हाही कवितेचा एक महत्त्वाचा भाषिक विशेष आहे. या वेगवेगळया भाषिक विशेषांचे वेगवेगळया प्रकारच्या कवितेतील स्वरूप आणि प्रयोजन भिन्न असते."[११]('कवितेचा शोध, वसंत पाटणकर,मौज प्रकाशन, मुंबई, २०११) प्राचीन चर्चकांनी त्यालाच वक्रोक्ती किंवा ध्वनी असे म्हंटलेले आहे. वाच्यार्थाने एखादी गोष्ट न सांगता ती ध्वनित करून सांगणे. यात सौंदय व अस्वदाकता वृद्धिंगत होत असते. वाचकांच्या अभिरुचीला रुचेल व सौंदर्य

उत्पत्ती होईल अशी भाषिक व्यवस्था कवितेला लाभली असते मात्र ती कृत्रिम असू नये. भाषिक सौंदर्याबरोबरच कवितेच्या भाषेला काव्यार्थ हा दुसरा भागही तेवढ्याच समर्थपणे सांभाळावा लागतो. पारंपारिक अभ्यासकांनी जी काव्यार्थाचे वाच्यार्थ, लक्ष्यार्थ, व्यंगार्थ हे उद्देश सांगितले आहेत. कवितेला ह्या दोन्ही बाजू समर्थपणे व समतोलपणे सांभाळाव्या लागतात. कवितेला कोणत्याही मानवी भाषेचे वावडे असू शकत नाही आधुनिक काळात तर ग्रामीण बोलीतील कवितेतून अभिव्यक्त होणारा आशय इतर प्रमाणभाषेतही अभिव्यक्त न करता येणारा ठरू लागला आहे. एकेकाळी याच भाषेला अव्हेरणारा आज मात्र सन्मानाने बोलीचा काव्यभाषा म्हणून आदराने उपयोग करू लागला आहे. त्यामुळे अनेक ग्रामीण, शेतकरी, मिथ्स असणाऱ्या सामाजिक अभिसारणाला उपयुक्त प्रतिमा कवितेतून अलीकडे येऊ लागल्या आहेत.

कवितेला भाषिक रूप देतांना पारंपारिक कवितेत व बहुदा अलीकडेही नाद, लय, छंद, वृत्त यांना भाषिक घटक म्हणूनच पाहिले गेले आहे. मात्र मुक्तछंदाने ही परिमाणे धूसर करून टाकली आहे. याचा अर्थ पूर्णच गद्य झाले असे नाही कवितेला या घटकांशिवाय काव्य म्हणता येणार नाही. मात्र नव्वदोत्तर कवितेत ही कृत्रिमता कवींनी शिथिल केल्याचे आजच्या कवितेवरून दिसून येते. कवितेची भाषा ही स्वायत्त असते. तिला स्वतःचा एक वेगळा चेहरा असतो तो याच घटकांमुळे. त्यातील शब्दांनाही अर्थाप्रमानेच नाद देखील असतो. याव्यतिरिक्त कवितेत न दिसणारा पण अत्यंत महत्वाचा घटक म्हणजे कवीचे अनुभवविश्व भाषिक रचनेसाठी तो अत्यंत महत्वाचा मानला पाहिजे. कवितेच्या भाषिक घटकांविषयी वसंत आबाजी डहाके म्हणतात, “कवितेतील आशय, आशयसूत्र, अनुभव, अनुभवविश्व, भावना, भावविश्व, हे ‘काव्यार्था’चेच घटक आहेत. अलंकार, प्रतिमा, रूपक, वक्रता, नियमोल्लंघन या भाषिक आणि प्रतीक, मिथक, आदिबंध या सांस्कृतिक विशेषांमधून काव्यार्थाची निष्पत्ती होते कवितेच्या भाषेचे हे घटक होत. ती व्याकरणिक नियमांचे, रुढींचे, आदर्शांचे, काव्यसंकेतांचे पालन अथवा उल्लंघन करीत असते. पदवक्रतेपासून प्रबंधवक्रतेपर्यंतचा विचार करणारा वक्रोक्तिसिद्धांत अतिशय महत्वाचा आहे. भाषेचा व्यवहारात आणि शास्त्रात उपयोग केला जातो त्याहून काव्याची भाषा वेगळी असते असे हा सिद्धांत सांगतो. व्यंग अर्थ हे काव्याचे महत्त्वाचे लक्षण असते असे सांगणारा ध्वनिसिद्धांतही तितकाच महत्वाचा आहे.”[१२](कवितेची समीक्षा : काही मुद्दे, वसंत आबाजी डहाके, काव्याप्रतीती, विजय प्रकाशन नागपूर, २०१३, पृ. ११३) पारंपारिक काव्य भाषेहून आजची भाषा जरी वेगळी नसली तरी तिचे उपयोजन हे इतर साहित्य प्रकारांहून भिन्न आहे हे इथे अधोरेखित करायचे आहे. आपण जी व्यवहारात उपयोगात आणतो तीच भाषा मात्र वेगळया शैलीतून तिच्या वेगवेगळया अर्थ पैलूंनी ती संपृक्त होते. आणि आशयाला गहनता आणून अर्थाचा गहिरा ठसा उमटविण्यास कारणीभूत ठरते अशी ही कवितेची भाषा असते.

एकंदरच कविता हा काव्यप्रकार समाजातील सर्वस्तरात लोकप्रिय असणारा असून एक दीर्घ परंपरा लाभलेला हा साहित्यप्रकार आहे. मराठीत विवेकसिंधू या काव्याग्रंथापासून, सुरु झालेला हा प्रवास ज्ञानेश्वर, महादंबा, नामदेव, तुकाराम, चोखामेळा इत्यादी संतप्रभूतींनी जनप्रबोधन करीत समाजाची घडी सुस्थितीत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. संतकविता, पंडिती कविता, तंत (शाहिरी) कविता  असा हा मध्ययुगीन कवितेचा तेराव्या शतकापासून सुरु झालेला काव्यप्रवास अठराव्या शतकापर्यंतच्या जडणघडणीच्या काळात समृद्ध होत गेल्याचे चित्र दिसते. या काळात कवितेचे विविध प्रकारही विकसित झाल्याचे दिसते साधारणतः पौराणिक ग्रंथांचा आधार घेत काही कथाभागांवर काव्य करून पांडित्यप्रचुर्यता उत्पन्न करणारे विदग्धकाव्य पंडिती काव्यात दिसून येते. महाकाव्य, खंडकाव्य, नाट्यकाव्य, संवादकाव्या, संगीतिका, मालिकाकविता, अभंग, ओव्या, आरती, स्तोत्र, धवळे, विराणी, गौळण, भारुड, पोवाडा, लावणी, धावा, विडे, पाळणा, भूपाळी, पदे इत्यादी काव्यप्रकार मध्ययुगीन कालखंडात प्रचलित होते. तर आधुनिक कालखंडात गीतकाव्य, गीत, पद, नाट्यगीत, गूढगीत, चिंतनिका, गद्यकाव्य, विलापिका, उद्देशिका, जानपदगीत, ग्रामगीत, बालकविता, विडंबनकाव्य, विरूपिका, वात्रटिका, रागचित्रे-तालचित्रे, सुनीत, मुक्त-सुनीत, गझल, दशपदी, रुबाई, कणिका, चारोळी(चतुष्पदी), हायकू, मूर्तकविता, एकलशब्दकविता, उपहासिका इत्यादी अनेक काव्यप्रकार मराठी काव्यक्षेत्रात आज रुजले आहेत. डॉ. अक्षयकुमार काळे यांनी या काव्याचे वर्गीकरण करतांना प्राचीन काव्य प्रकारांना ‘निबद्ध’ तर अर्वाचीन काव्याप्रकारांना ‘अनिबद्ध’ म्हटले आहे. साठोत्तरी साहित्यक्षेत्रात निर्माण झालेले वेगवेगळे वैचारिक प्रवाह कवितेने प्रचंड क्षमतेने पुढे आणले आहे. मानवी समाजातील अनेक दुर्लक्षित घटक कवितेच्या भावविश्वात गुंफून अत्यंत

प्रभावीपणे मांडले आहे. जागतिकीकरणाच्या अजस्त्र युगात माणसाला सतत जागे ठेवण्याचे काम नव्वदोत्तर कविता करतांना दिसते आहे. आता कविता ही माणसाला केंद्र मानून त्याचा भवताल चितारण्यावर भर देतांना दिसते. ही काळाची व कलेचीही आवश्यकता आहे असेच म्हणावे लागेल.

आज कविता ही वेगवेगळ्या पातळ्यांवर समृद्ध असल्याचे जाणवते. कवितेतील शब्दांची ताकत प्रचंड आहे त्यामुळे तिचा उचित उपयोग करून समाजाची घडी सुस्थितीत ठेवणे ही या प्रतिभावंत कवींवरची फार मोठी जबाबदारी आहे.

टिपा :


१. डॉ ,विजय प्रकाशन ,एक साहित्यप्रकार: कविता ,वसंत आबाजी डहाके .नागपूर ५५.पृ ,२०१३ .सेप्टे .आ.प्र ,
२. डॉ२०१४ मे ११-१० ,नागपूर ,बीजभाषण ,आंबेडकरी काव्यसंगीती ,यशवंत मनोहर .
३. तत्रैव११-१० .पृ ,
४. डॉ५८.पृ ,उनि ,वसंत आबाजी डहाके .
५. गंगाधर पाटील४० .पृ ,२००१ .आ.मुंबई द्वि ,मॅजेस्टिकप्रकाशन ,समीक्षेची नवी रूपे ,
६. डॉ'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन' ,अक्षयकुमार काळे ., पां७२३ .पृ ,१९९९ ,बनहट्टी प्रकाशन नागपूर .ना .
७. रमेश तेंडूलकर ,'गीतभान', विश्वमोहिनी१९८२ ,पुणे ,
८. डॉ.उनि ,वसंत आबाजी डहाके .
९. तत्रैव
१०. डॉ७२७ .पृ .उनि ,अक्षयकुमार काळे .
११. डॉ२०११ ,मुंबई ,मौज प्रकाशन ,कवितेचा शोध ,वसंत पाटणकर .
१२. वसंत आबाजी डहाके ,'कवितेची समीक्षा 'काही मुद्दे :, काव्याप्रतीती .पृ ,२०१३ ,विजय प्रकाशन नागपूर , ११३